वाचा :- १. शासन निर्णय क्रं. दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजा/मंत्रालय, मुंबई, दिनांक - ०५.१२.२०११

२. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रं. दवसु- २०१३/प्र.क्र. ८५/अजाक-१ मुंबई - ३२ दिनांक - ०१ ऑगष्ट, २०१३

३. शासन निर्णय सामाजिक न्याय विभाग मंत्रालय, मुंबई - ३२ क्र. दवसु/२०१५/प्र.क्र. ५९/अजाक-१ दिनांक - ०८.०३.२०१६.

४. शासन निर्णय सामाजिक न्याय विभाग मंत्रालय, मुंबई - ३२ क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.-७९/अजाक, दिनांक - ०६.१०.२०२१.

५. शासन निर्णय सामाजिक न्याय विभाग मंत्रालय, मुंबई - ३२ क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.-१०९/अजाक, दिनांक - १६.१२.२०२१.

६. मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती नागपूर यांचे निधी वितरण आदेश क्रं. सआसकना/जिवायो/नि.वि./२०२२-२३/१७३०, दिनांक - १९.०३.२०२३.

७. समाज कल्याण समिती दिं. २३.०३.२०२३ चे सभेतील विषय क्र. ३, ठराव क्र. २ अन्वये कामांना प्राप्त मंजूरी.

कार्यालय : जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर

जा.क्र. जिपना/सकवि/अजानबौघवि/प्रशासकिय मंजुर कामे/योजनांतर्गत/२०२२-२३/ ३४०० दिं. 3913123

आदेश

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजने अंतर्गत सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात गट विकास अधिकारी, **भिवापूर** यांनी सादर केलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजने अंतर्गत अद्यावत प्राप्त प्रस्तावांना संदर्भ क्र. ४ अन्वये खालीलप्रमाणे दर्शविलेल्या वस्तीत बृहत आराखडयातील अनुदानानुसार रक्कमेस व कामास मंजुरी प्रदान केली आहे. त्याप्रमाणे खालील कामांना मी अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर आदेशातील अटी व शर्तीनुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, **भिवापूर** यांना प्रशासकीय रकमेस मंजुरी तथा मंजुर प्रशासकीय रकमेच्या ९० टक्के निधी मंजुर करुन वितरीत करण्यास मंजुरी प्रदान करीत आहे.

पंचायत समिती - भिवापूर सन २०२२-२३

अ. क्र.	ग्राम पंचायत	गावाचे नाव	दलित वस्तीचे नाव	सांकेतांक क्रमांक	कामाचा प्रकार	प्रशासकीय मंजुर रक्कम (रु. लाखात)	या आदेशान्वये ९०% वितरीत रक्कम (रु. लाखात)
१	२	३	४	५	६	७	८
१	तास	तास	आंबेडकर नगर	३१-०१३-००१७	बंदिस्त नाली	४.००	३.६०
२	पुल्लर	सोमनाळा	दलित वस्ती वार्ड क्र २	३१-०१३-००२१	बंदिस्त नाली	४.००	३.६०
३	पुल्लर	कोलारी	दलित वस्ती कोलारी वार्ड क्र ३	३१-०१३-००२२	बंदिस्त नाली	४.००	३.६०
४	कारगाव	कारगाव	आंबेडकर नगर वार्ड न. ०३	३१-०१३-००३४	भुमिगत नाली	१.००	०.९०
५	विरखंडी (धा.)	विरखडी (धा.)	दलित वस्ती विरखंडी	३१-०१३-००४६	नाली बांधकाम	४.००	३.६०
६	नवेगाव देशमुख	नवेगाव देशमुख	दलित वस्ती वार्ड क्र.१ नवेगाव देशमुख	३१-०१३-००४९	भुमिगत नाली	४.००	३.६०
७	नवेगाव देशमुख	रानमांगली	दलित वस्ती वार्ड क्र.१ नवेगाव देशमुख	३१-०१३-००५०	भुमिगत नाली	४.००	३.६०
८	धामणगाव (वि.म.)	धामणगाव (वि.म.)	आंबेडकर वार्ड वार्ड न. ०२	३१-०१३-००६०	सिमेंट नाली	४.००	३.६०
९	वाकेश्वर	वाकेश्वर	सम्राट अशोक वार्ड नं १	३१-०१३-००७२	सिमेंट नाली	२.००	१.८०

Scanned by CamScanner

१	२	३	४	५	६	७	८
१०	चिचाळा	चिचाळा	रमाई नगर वार्ड क्र.०१	३१-०१३-००७६	भुमिगत नाली	४.००	३.६०
११	शिवापूर	शिवापूर	दलित वस्ती शिवापूर वार्ड क्र.३	३१-०१३-००८५	सिमेंट रस्ता व नाली	३.००	२.७०
१२	आलेसुर	खोलदोडा	दलितवस्ती खोलदोडा रमाई वार्ड	३१-०१३-०१००	पाण्याची टाकी व टाकीवर सोलर पंप	६.००	५.४०
१३	आलेसुर	खापरी	दलितवस्ती खापरी	३१-०१३-०१०२	सिमेंट रस्ता	४.०५	३.६५
१४	झमकोली	झमकोली	दलित वस्ती झमकोली	३१-०१३-०१०४	सिमेंट रस्ता व नाली	६.००	५.४०
१५	भिवी	उरकूडपार	महात्मा फुले दलित वस्ती	३१-०१३-०१०६	सिमेंट रस्ता व नाली	६.००	५.४०
१६	सालेभट्टी (दंदे)	खातखेडा	दलित वस्ती खातखेडा	३१-०१३-०१११	भुमिगत नाली	१.००	०.९०
१७	बेसूर	बेसूर	वॉर्ड क्र.४ बौद्ध मोहला	३१-०१३-०११२	सिमेंट रस्ता	४.००	३.६०
१८	बेसूर	बेसूर	आंबेडकर नगर वॉर्ड ३	३१-०१३-०११३	सिमेंट रस्ता	५.००	४.५०
१९	भगवानपुर	सायगाव	वार्ड क्र.१ रमाबाई आंबेडकर वार्ड	३१-०१३-०११४	भुमिगत नाली	३.००	२.७०
२०	भगवानपुर	भगवानपुर	वार्ड क्र.३ आंबेडकर वार्ड	३१-०१३-०११५	सिमेंट रस्ता व नाली	६.००	५.४०
२१	पिरावा	पिरावा	डॉ. आंबेडकर नगर वार्ड नं. ३ पिरावा	३१-०१३-०११९	भुमिगत नाली	४.००	३.६०
२२	इंदापूर	इंदापूर	दलित वार्ड १	३१-०१३-०१२१	भुमिगत नाली	३.५०	३.१५
२३	बोटेझरी	बोटेझरी	आंबडेकर वार्ड	३१-०१३-०१२५	विहिरतोंडी बांधकाम व दुरुस्ती	३.००	२.७०
२४	कवडसी	कवडसी	आंबडेकर वार्ड	३१-०१३-०१२७	भुमिगत नाली	४.००	३.६०
२५	नागतरोली	जांभूरडा	रमाई नगर	३१-०१३-०१३२	सिमेंट रस्ता	२.००	१.८०
२६	पुल्लर	पुल्लर	फुले नगर वार्ड क्र.१	३१-०१३-०१४५	सिमेंट रस्ता	५.००	४.५०
२७	पुल्लर	सोमनाळा	गौतम नगर वार्ड क्र २	३१-०१३-०१४६	सिमेंट रस्ता	५.००	४.५०
						१०५.५५	९५.००

(प्रशासकीय मंजुर रक्कम रुपये : एक कोटी पाच लाख पंचावन हजार फक्त)

(वितरीत करावयाची रक्कम रु. पंच्यानऊ लाख फक्त)

(वर्षा गौरकर)
अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर

लेखाशिर्ष : सदरचा खर्च २२२५ अनुसुचित जाती/जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण ८०० इतर खर्च पंचवार्षीक योजनेअंतर्गत योजना (०६)(०२) महाराष्ट्र जिल्हा परिषदांना अनुदान (२२२५- E-६५२) दलितवस्ती सुधारणा -३१ सहाय्य अनुदान या लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा. कामाचे संदर्भात असणा-या अटी व शर्तीचे विवरण १ ते २३ सोबत जोडण्यात येत आहे.

अटी व शर्ती

१. कार्यारंभ आदेश व करारनामा करण्यापुर्वी प्रशासकीय मंजुरीनुसार प्राकलनास तांत्रिक मंजुरी प्राप्त करुन घ्यावी त्यानंतरच पुढील कार्यवाही करावी. तसेच देय अनुदान लोकसंख्येनुसार वस्तीला देय आहे. त्याठिकाणी कामाची आवश्यकता आहे, याची पडताळणी करुन काम सुरु करावे. करारनामा करण्यापुर्वी मंजुर काम यापुर्वी

Scanned by CamScanner

इतर निधीतुन मंजुर झाले आहे काय यांची खात्री/शहनिशा करुनच ग्रामपंचायतीस अनुदान वितरीत करावे. या आदेशान्वये मंजुर केलेल्या कामाचा निधी त्याच वस्तीत त्याच ठिकाणी खर्च करुन घेण्याची जबाबदारी आपली राहील.

२. ज्या अनुसूचित जाती नवबौध्द घटकाच्या वस्तींमध्ये काम मंजूर झाले आहे त्या वस्तीमध्ये अनु. जातीची लोकसंख्या निकषाप्रमाणे असल्याबाबतची खात्री करावी व निकषाप्रमाणे अनु. जाती लोकसंख्या नसेल तर त्या कामांचे करारनामे करु नये. त्याबाबत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर, यांना तात्काळ लेखी कळवावे तसेच चुकीच्या ठिकाणी काम केल्यास ग्रामपंचायत सचिव तसेच संबंधित गट विकास अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

३. मंजुर केलेल्या कामाचे उर्वरीत रक्कमेचे मागणी प्रस्ताव पाठवितांना प्रस्तावात अनुसुचित जाती नवबौध्द वस्तीचा विकास या वस्तीचा सांकेतांक क्रमांक नमुद करणे आवश्यक राहील त्याशिवाय उर्वरीत रक्कमेचे निधी वितरण आदेश निर्गमित केल्या जाणार नाही. तसेच काम सुरु करण्यापूर्वीचा छायाचित्र व काम पूर्ण झाल्यानंतरचे छायाचित्र सादर करावे.

४. मंजुर केलेल्या कामाचा कामनिहाय प्रगती अहवाल प्रत्येक महिण्याच्या ५ तारखेस कामनिहाय जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना सादर करावा.

५. वित्त विभागाकडुन वित्त प्रेषणाव्दारे प्राप्त झालेली रक्कम अटीशर्तीप्रमाणे विहीत कालावधीत खर्च करावी. तसेच मध्यवर्ती बँक मध्ये काढलेल्या संयुक्त खात्यात रक्कम जमा करावी. ही रक्कम साधारण हप्त्यामध्ये देण्यात येईल. अंतिम हप्त्याची मागणी करतांना पुर्ण झालेल्या कामास गट विकास अधिकारी/ शाखा अभियंता/विस्तार अधिकारी पंचायत यांनी कामास स्थळभेट देवुन तपासणीचा अहवालासोबत काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र/कामाचे मुल्यांकन व खर्च उपयोगिता प्रमाणपत्र/ योजनेचे नामफलक (फोटो) व इतर आवश्यक प्रमाणपत्रासह परिपुर्ण प्रस्ताव सादर करणे अनिवार्य राहील. त्याशिवाय उर्वरीत रक्कमेचे देय निधी वितरीत केल्या जाणार नाही. तांत्रिक मंजुरी प्राप्त झाल्यानंतर निधी प्रत्यक्षात ग्रामसेवक व गट विकास अधिकारी यांचे संयुक्त खात्यात जमा करण्यात यावे.

६. मंजुर रक्कमे पेक्षा लागणारी जास्त रक्कम ग्रामपंचायतीने प्रथम आपल्या फंडातून किंवा श्रमदानाने उपलब्ध करुन काम करावे. मंजुर झालेल्या कामामध्ये बदल करता येणार नाही.

७. मंजुर रक्कम गट विकास अधिकारी यांनी खालीलप्रमाणे हप्त्यात ग्रामपंचायतीला देण्यात यावी.

अ) प्रथम हप्ता :- मंजुर रक्कमेतुन काम सुरु करण्यापुर्वी ग्रामपंचायतीला २५ टक्के अदा करावी प्रथम हप्ता गट विकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त खात्यात जमा करावी.

ब) **दुसरा हप्ता :-** प्रत्यक्षात झालेल्या कामाचे वेळोवेळी मुल्याकंन करुन उदा : २५ टक्के व नंतर ७५ टक्के आणि ९० टक्के याप्रमाणे टक्केवारीनुसार ग्रामपंचायतीस रक्कम वितरीत करण्यात यावी.

क) अंतिम हप्ता :- त्यानंतरची उर्वरीत १० टक्के रक्कम काम पुर्ण झाल्यानंतर कामपुर्णत्व प्रमाणपत्र,मुल्याकंन प्रमाणपत्र, तांत्रिक मान्यतेची प्रत, गट विकास अधिकारी पं.स. यांचा काम तपासणी अहवाल, काम पूर्ण झाल्यानंतरचे छायाचित्र यासह १० टक्के रक्कमेची मागणी प्रस्ताव सादर करावा.

८. ग्रामपंचायतीच्या नावाने धनादेश अकाऊंट (पेयी) रेखांकित (क्रॉस) करुन द्यावा व मंजुर रक्कमेच्या संबंधित ग्रामपंचायत सचिव व गट विकास अधिकारी यांचे नावाने संयुक्त खाते उघडुन त्यामध्ये जमा करावे.

९. मंजुर केलेली कामे आराखडयाप्रमाणे पुर्ण करुन घेण्याबाबत गट विकास अधिकारी यांनी संबंधित ग्रामपंचायती सोबत करारनामा करुन घ्यावा.

१०. ज्या जागेवर बांधकाम करावयाचे आहे ती जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असल्याबाबत पुन:श्च खात्री करुन कामास सुरुवात करावी. जागेचा मालकी हक्क तपासुन व मंजुर प्रस्तावानुसार जागेवरच काम सुरु करावे. तसेच मंजुर कामाच्या निधीनुसार प्राकलन तयार करुन त्याची प्रत कार्यालयास सादर करावी.

११. सदर कामाची अमंलबजावणी पंचायत समितीने उप अभियंता व गट विकास अधिकारी यांचे सल्ल्याने करण्यात यावी.

१२. काम मंजुर झाल्याचे दिनांकापासुन ६ महीण्यात काम पुर्ण करावे. काम मंजुर केल्यापासुन ६ महिण्यात संबंधित ग्रामसेवकाच्या सहाय्याने ग्रामपंचायतीमार्फत पुर्ण करण्याची जबाबदारी गट विकास अधिकारी यांची राहील गावातील काम अपुर्ण असल्यास त्या ग्रामपंचायतीला पुढील २ वर्षाकरीता निधी देय होणार नाही.

१३. सदर योजनेखाली मंजुर आराखडयाप्रमाणे सर्व कामे पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी ही गट विकास अधिकारी यांची राहील. तसेच मंजुर रक्कम प्रत्येक अनु.जातीच्या लोकसंख्येच्या निकषाप्रमाणे जास्त होणार नाही व एकाच कामासाठी दोन वेळा रक्कम अदा होणार नाही याची खात्री करुनच रक्कम अदा करावी.

Scanned by CamScanner

१४. या योजनेखाली अपूर्ण राहीलेले काम पुर्ण करुन घेणे, शिल्लक रक्कम चलनाने शासन खाती जमा करणे याची सर्व जबाबदारी गट विकास अधिकारी यांची राहील. योजनेखालील कामांची महालेखापाल यांनी लेखा तपासणी केली व तपासणीमध्ये त्या त्रुटयांचा परिच्छेदावरील अनुपालन अहवालाबाबत पुर्तता ही गट विकास अधिकारी यांची जबाबदारी राहील. तसेच कामाचे प्रमाणपत्र गट विकास अधिकारी यांचे मार्फत प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

१५. अनुसुचित जाती नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास या योजनेची कामे हाती घेण्यात आली आहे. त्या कामांचा उपयोग सदरच्या वस्तीला देण्याची दक्षता घ्यावी व त्याबाबतची उपयोगीता प्रमाणपत्र जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावी.

१६. अनुसुचित जाती नवबौध्द घटकाच्या वस्तीचा विकास योजनेसाठी मंजुर झालेली रक्कम ही इतर कोणत्याही कामासाठी खर्च करता येणार नाही. तसे घडल्यास गट विकास अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

१७. गट विकास अधिकारी यांनी काम सुरु करण्यापूर्वी तेथील परिसराची छायांचित्रे सादर केलेली आहे. त्याच ठिकाणी काम सुरु करावे. तसेच काम सुरु करण्यापुर्वी आवश्यक नामफलक लावावा तसेच काम पुर्ण झाल्यावर १० टक्के अंतिम हप्ता निधी मागतांना कार्यालयास त्याठिकाणाचा प्रस्तावासोबत फोटो काढलेला आहे त्या ठिकाणी काम पुर्ण झाल्यावर फोटो काढावा व सादर करावा.

१८. काम पुर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी बोर्डावर/नामफलकावर खालीलप्रमाणे योजनेची माहिती नमुद करावी. व त्या बोर्डाचा फोटो निधी मागणी देयकासोबत फोटो जोडण्यात यावा.

१९. मा. राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र दिनांक ०१.०९.२०१७ मधिल मुद्दा क्रमांक १०.३ अन्वये अ.क्र. १ ते ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे ज्या मतदार क्षेत्रात निवडणुक आहे त्या ग्रा.पं. सोबत आचारसंहिता संपत पर्यंत करारनामा करु नये.

(नामफलक मसुदा खालीलप्रमाणे साईज ३ x ४)

*** महाराष्ट्र शासन ***

सामाजिक न्याय विभाग

(समाज कल्याण विभाग जि. प. नागपूर)

***** अनुसुचित जाती व नवबौध्द घटकाच्या वस्तीचा विकास करणे *****

१) ग्रामपंचायतीचे नांव :-
२) वस्तीचे नांव व सांकेतांक क्रमांक :-
३) मंजुर कामाचे नांव :-
४) प्रशासकीय मंजुर रक्कम :-
५) कामाचे प्रत्यक्ष स्थळ :-
६) काम सुरु झाल्याचा दिनांक :-
७) काम पुर्ण झाल्याचा दिनांक :-

२०. शासन आदेशानुसार ई निविदा (E Tendaring) करणे बंधनकारक आहे.

२१. मंजुर कामाबाबत शासन निर्णय क्र. दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजा/मंत्रालय, मुंबई, दिं. ०५.१२.२०११ मधील मुददयांचे तंतोतंत पालन करावे.

२२. ई- निविदा कार्यवाही नुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने निविदा कार्यवाही झाली असल्यास सदर बचतीची तथा शिल्लक रक्कम समाज कल्याण विभाग जि. प. नागपूर, कडील <u>योजनेचा लेखाशिर्ष :- ०२५० इतर सामाजिक सेवा १०२ अनुसुचित जाती, अनुसचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण ८०० इतर जमा ०२५०००२८०० या लेखाशिर्षाखाली रक्कम कोषागारात चलानव्दारे भरणा करण्यात यावी.</u> व प्रत समाज कल्याण विभागास सादर करावी.

२३. प्रस्तावित मंजुर कामे ही नगरपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका किंवा महानगरपालिकेच्या हददीत / कार्यक्षेत्रात नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

<u>वरील १ ते २३ च्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.</u>

(वर्षा गौरकर)
अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर

Scanned by CamScanner

प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपुर.

माहिती तथा योग्य कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

१. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नागपुर आपण उपरोक्त दर्शविलेल्या रकाना क्र. ८ मध्ये नमुद केलेल्या रक्कमा (९०% निधी) वित्त प्रेषणाव्दारे संबधित गट विकास अधिकारी यांना उपलब्ध करुन दयावी.

२. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपुर.

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती - **भिवापूर** यांनी खालील शर्ती व अटीनुसार प्राधान्याने पडताळणी करुनच कार्यवाही करावी तसेच आदेशासोबत संलग्न १ ते २३ अटीनुसार कार्यवाही करावी.

माहितीस्तव :-

१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नागपुर यांना समादराने अग्रेषित.

२. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांना समादराने अग्रेषित.

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, **भिवापूर** यांनी मंजुर करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींना आदेशाच्या प्रती तात्काळ वितरीत करावी.

४. सरपंच/सचिव, ग्राम पंचायत.....

अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
& जिल्हा परिषद, नागपूर

Scanned by CamScanner